# राशिभविष्य - नोव्हेंबर , २०१५.

दादा दामले (dadadamle@gmail.com)

==========================================

## सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

==========================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा एकूण सर्व काळ फारसा अनुकुल नाही, असेच म्हणावे लागेल. केवळ गुरु ग्रहच अनुकुल असल्याने या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. तसेच अध्यात्माची आवड व ओढ असलेल्यांना साधनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. या काळात या राशीच्या काही मंडळींचा स्वभाव लहरी, चंचल झाला असणेही शक्य आहे. तसे असेल तर अविचाराने वागून आर्थिक नुकसान होण्याची दाट शक्यता आहे. जपा. या राशीच्या द्वादश स्थानी असलेला हर्षलअत्यंत तापदायक ठरू शकेल. तसेच अपेक्ाभंगहोणेही शक्य आहे. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेला मंगळ उष्णतेचे विकार निर्माण करण्याची शक्यता दिसते. ताप येणे, अंगावर फोड्येणे, इजा होणे, रक्तविकार बळावणे अशापैकी आजार निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. हृदयविकार असणारांनी प्रयत्नपूर्वक स्वस् थ व शांत राहण्याचा प्रयत्न करणेच इष्ट होईल. असे असले तरी यांत्रिक - तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना तसेच औषध विक्रेत्यांना काळअनुकुल व लाभदायक होईल. त्याचप्रमाणे चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारानाही काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. परधर्मीयांशीव्यावसायिक संबंध असणारांनाही अशा संबंधामुळे काळ लाभदायक होईल. तुलनात्मक दृष्ट्या महिन्याच्या पूर्वार्धापेक्षा महिन्या चा उत्तरार्ध अनुकुल व सुखकारक होईल. तापट स्वभावर नियंत्रण ठेवून व सहनशील बनून आचरण कराल तर खूपच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना अनुकुल होईल व स्वस्थता लाभेल.

**(२) वृषभ -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अधिक प्रमाणात अनुकुल, लाभदायक व सुखकारक होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीनी जे काय साधावयाचे ते पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात अनारोग्य व मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. पण मानसिक रोग तज्ञ व द्रव पदार्थांचे व्यापारी यांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व समाधानकारक असा जाईल. मात्र मित्रांशी , सहकाऱ्याशी वाद, भांडणे होणार नाहीत, याची काळजी घ्या. इतर नोकरी-व्यवसाय असणारांच्या नोकरी-व्यवसायात अस्थिर परिस्थिती निर्माण होणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, गृहसौख्य लाभेल, काही मंडळीचे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार होतील; पण नातेवाईक मंडळीकडून मनस्ताप दिला जाण्याची शक्यता दिसते. जपा. पंचम स्थानी असलेल्या राहू-मंगळामुळे संतती सुखात बाधा येणे संभवते. मुलांपैकी कोणाचे आजारपण, कोणाचे अयोग्य आचरण, कोणाचे अभ्यासाकडे दुर्लक्ष अशापैकी कारणानी अपेक्षित संततिसुख मिळणे शक्य दिसत नाही. पण दलाली, कमिशनवर व्यवसाय करत असणारांना मात्र राहूमुळे अपेक्षित अर्थलाभ होणे शक्य

आहे. तसेच या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वा अन्य कारणाने वैवाहिक जीवनातील अपेक्षित सुख समाधान मिळू शकणार नाही. जपा. तसेच महिन्याच्या उत्तरार्धात स्वत:च्या आरोग्याकडेही लक्ष द्यावे लागेलसे दिसते. ताप येणे, अपचन होणे, अन्य पोटविकार बळावणे अशापैकी आजार होण्याची शक्यता दिसते. जपा. श्रद्धा असेल तर शिवोपासना स्वास्थ्य व मन:शांत ीदेऊ शकेल.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध सर्वच दृष्टीनी प्रतिकुल व मनस्ताप देणारा असल्याचा अनुभव येईल. नोकरीत वरिष्ठांची अवकृपा, कौटुंबिक जीवनात प्रिय जनापासून होणारा दुरावा, मतभेद, वाद, भांडणे, घडणाऱ्या अनिष्ट घटना, स्वत:चे अनारोग्य , राहत्या जागेची किंवा स्थावर संबंधी समस्या, संततिविषयक समस्या अशापैकी विविध कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून आणि सहनशील बनून आचरण केल्यास होणारा मनस्ताप सुसह्य होईल. अशा परिस्थितीतही शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे सात्विक सुखशांती व स्वस्थता लाभू शकेल. महिन्याचा उत्तरार्ध तुलनात्मक दृष्ट्या खूपच अनुकूल व प्रगतिकारक व सुखकारक असल्याचा अनुभव येईल. विरोधक निष्प्रभ होतील. सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना नोकरीत अनुकूल व सुखक ारक काळ असल्याचा अनुभव येईल. आरोग्य सुधारेल. हाती घेतलेल्या कार्यात यश लाभेल. बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असण ारांना विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. प्रवासाचे योग येतील. आर्थिक लाभ होतील. येथे एक महत्वाची गोष्ट सांगावीशी वाटते, की या राशीच्या युवकांनी सध्या आहे तो नोकरी-व्यवसायच चिकाटीने करावा. हातचे सोडून नवीन काही करण्याचा प्रयत्न अजिबात करू नये. श्रद्धेने श्रीगुरू दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपण े " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण करा.

**(४) कर्क -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्ध गृहसौख्यास व उत्तरार्ध नोकरीत प्रतिकुल असाच असण्याची शक्यता दिसते. पण उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल , प्रगतिक ारक व लाभदायक होईल. या राशीच्या काही मंडळीकडून " पोटात एक, ओठात दुसरेच !" असे आचरण होणे संभवते. तसे आचरण नुकसानकारक आहे याची त्यांनीजाणीव ठेवावी. या राशीच्या तृतीय स्थानी असलेले राहू-मंगळ या राशीच्या मंडळीच्या मनात उत्साह , स्फूर्ती व महत्वाकांक्षाजागृ त होणे संभवते. तसेच मनाचे औदार्य प्रदर्शित करण्याचा मोहही निर्माण होईल. गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने कुटुंबात शुभ घटना घडतील, स्वतंत्र व्यवसाय असणारांच्या व्यवसायात वाढ होण्यास काळ

अनुकुल होईल. अपेक्षित अर्थलाभ होईल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री - ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. मात्र या राशीच्या पंचम स्थानी असलेले शनि व रवि विविध कारणांनी संततिसुखात बाधा निर्माण करतीलसे दिसते. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगत ीत विविध कारणानी अडथळे, अडचणी निर्माण होणे संभवते. या राशीच्या काही मंडळीना प्रवासयोग येतील. पण प्रवासात इजा होण्याची शक्यता दिसते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात गृहसौख्य व मित्रसुख मिळेल. मन:स्वास्थ्यासाठी दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे " पठण करा.

**(५) सिंह -** या राशीच्या नोकरदार मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच काही प्रमाणात अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात मात्र सर्वच बाबतीत प्रतिकुल परिस्थितीला तोंड द्यावे लागेलसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात गुरु ग्रह सोडून इतर सर्वच ग्रह प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे घरीदारी सर्व ठिकाणी मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. काळ प्रतिकुल आहे याची जाणीव ठेवून मन व विचारशक्तीवर ताबा ठेवून, जिभेला लगाम घालून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. नपेक्षा मनाविरुद्ध घडणाऱ्या घटना, आर्थिक समस्या, विविध कारणांनी कौटुंबिक व वैवाहिक जीवनात निर्माण होणारा तणाव, छोटेमोठे अपघात, इजा, स्वत:चे व कुटुंबातील अन्य कोणाचे गंभीर आजारपण, राहत्या जागेची समस्या किंवा स्थावरसंबंधी समस्या यांमुळे त्रस्त व्हाल. काहीना त्वचा रोगाचा त्रा स तर काहीना मुख दंत विकाराचा त्रास तर काहीना रक्तविकाराचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. अशा विपरीत काळात गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकूल होईल व विविध प्रकारचे लाभ होतीलसे दिसते. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांना सुद्धा शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. प्रतिकुल काळात मन:शांती लाभावी यासाठी श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे एकाग्र मनाने " बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे " पठण करा.

**(६) कन्या -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा उत्तरार्ध अधिक अनुकुल,

प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीत विरोधी परिस्थिती निर्माण होणे संभवते. त्यामुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जिद्दी स्वभावामुळे अकारण श्रम व दगदग होणे संभवते. त्यामुळे अनारोग्यही होणे शक्य आहे. जपा. अपमान झाल्यास सूडबुद्धी निर्माणहोईल. जपा. काहींना नेत्राविकाराचा तर काहींना वातविकाराचा त्रास सहन करावा लागेल. आर्थिक समस्या त्रस्त करतील. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीतील परिस्थिती सुधारेल व अनुकुल घटना घडतील. काहींना उत्तम नोकरी लागेल; तर काहींना आवडते कार्यक्षेत्र प्राप्त होईल. मात्र कोणाशी शत्रुत्व निर्माण होणार नाही, असे आचरण करा. शत्रुराशीतील शनी ग्रहामुळे भावंड विषयक एखादी चिंता त्रस्त करीलसे दिसते. षष्ठ स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे काहीना फसवणकीचा त्रास तर काहीना काल्पनिक आजाराची भावना त्रस्त करील. तसेच काहीना अस्थिर मनस्थितीचा त्रास सहन करावा लागेल. मतभेद, जीवनसाथीचे विचित्र आचरण, कोर्ट प्रकरणे असतील तर त्यांचा त्रास सहन करावा लागेल व त्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येऊ शकेल. अध्यात्म , सामाजिक कार्य यांची आवड असणारांना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल होईल व कार्यात प्रगती होईल. शक्यतो प्रवास करू नका. त्रास होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(७) तुळा -** सध्या या राशीच्या मंडळीचे मन अत्यंत भावनाशील व चंचल झाले असण्याची शक्यता जाणवते. त्यात सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडत असण्याची शक्यताही दिसते. कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. कोर्ट प्रकरणे असतील तर त्यांचा त्रासही सहन करावा लागेल. त्यात भर म्हणून आर्थिक समस्याही निर्माण होणे संभवते. अशा परिस्थितीत मनावर व विचारशक्तीवर अनावश्यक ताण पडून काहींना डोकेदुखीचा तर काहींनामेंदूविकाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता जाणवते. काहीजण गलितगात्र होणेही शक्य आहे. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी विशेषकाळजी घेणे जरूरीचे होईल. प्रिय जनांशी वाद, भांडणे होणार नाहीत, याची काळजी घ्या. शारीरिक उष्णता भडकून काहींना मुदतीचा ताप, काहींना डोळ्याची दुखणी, काहींना घसा,मान, दात दुखीचा त्रास होणे संभवते. जपा. मंगळ ग्रह अत्यंत प्रतिकुल आहे. त्यामुळे काही जुनी दबलेलीप्रकरणे असतील तर त्यांचा असह्य मनस्ताप सहन

करावा लागेल. जपा. शनि ग्रहाच्या साडेसातीचा अखेरचा सव्वा वर्षाचा काळ बाकी आहे. तेवढा काळ सहनशीलतेने, नम्रतेने व मन शांत ठेवून जाऊ दिलात तर भावी काळातील अनुकुलतेचा आनंद चाखता येईल. अशा प्रतिकुल काळात गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. अध्यात्मात रस असेल तर उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल.

**(८) वृश्चिक -** शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे; त्यामुळे या राशीच्या मंडळीनी मनावर व विचारशक्तीवर ताबा ठेवून संयम आणि सहनशीलतेचे आचरण केले तर खूपच सुखाचे होईल. सर्व प्रकारच्या अनारोग्या चा फारसा त्रास होणार नाही. या माहिन्याचा काळ या राशीच्या मंडळीना फारसा अनुकुल नसल्याने सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडणे संभवते. नोकरी-व्यवसायात, घरीदारी सर्व ठिकाणी मनस्ताप देणाऱ्या घटनाच घडण्याची शक्यता जाणवते. अशा परिस्थितीत न चिडता, न संतापता सहनशील बनून नम्रतेचे आचरण करणेच सुखाचे होईल. घरच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आवश्यक ती अर्थप्राप्ती मिळविण्यासाठी खूप परिश्रम व दगदग कराल तर प्रचंड थकवा येईल. या राशीच्या काही मंडळीना प्रिय जनांच्या स्थलांतरामुळे वियोगाचे दु:ख सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. जीवन-साथीच्या अनारोग्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येणे संभवते. तसेच विविध कारणांनी या राशीच्या मंडळीच्या संततीसुखात बाधा येणे शक्य आहे. अशा प्रतिकुल परिस्थितीत गुरु-शुक्र या सात्विक ग्रहांच्या मदतीने मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या मंगळामुळे काहीना मौल्यवान गोष्टींची प्राप्तीहोणे संभवते. नोकरीत अधिकार असलेल्या मंडळीना वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी त्यांनी तो मोह सोडावाच. तेच सुखाचे होईल. केवळ बौद्धिक, व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारानाच काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धेने हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तरीही व्ययस्थानी असलेला शनि ग्रह सहज सुखसमाधान देणार नाही, ही बाब ध्यानात घेऊन सावधानतेने व खात्रीपूर्वक परिस्थिती असल्याचे पाहूनच कार्यवाही करा. शासकीय नोकरदार मंडळीना विविध प्रकारचे लाभ होणे संभवते. काहीना बढती, काहीना पगारवाढ, कर्तृत्ववान मंडळीना उच्च पद वा मानाचे स्थान मिळू शकेल. स्वतंत्र व्यवसाय असणारांना तसेच यांत्रिकतांत्रिकनोकरी -व्यवसाय असणारानाही व्यवसायात वाढ करण्यास परिस्थिती अनुकुल होईल व आर्थिक लाभ होतील. पण वाममार्ग धन सहज देणे/घेणे शक्य असले तरी तो मोह टाळाच. साडेसातीचा काळ आहे व शनि ग्रह तुमची सत्वपरीक्षा पाहण्यास विविध प्रकारे अडचणी निर्माण करण्याची शक्यता आहे. सर्व आर्थिक व्यवहार सावधानतेने व फसवणूकहोणार नाही याची खात्री करूनच करा. मनस्ताप व मानहानी होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात रवि, बुध व्ययस्थानी गेल्यावर तर खूपच सहनशील बनून व मन शांत ठेवून नम्रतेचे आचरण करा. त्यामुळे प्रतिकुलपरिस्थितीला टक्कर देणे सहज शक्य होईल. नपेक्षा नैराश्य येऊन शारीरिक अनारोग्य होणेही शक्य आहे. जपा. मन भावनाशील बनेल व मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी अस्वस्थता येईल. अशा परिस्थितीतही काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग संभवतात. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेले हर्षल व केतू हे दोन्ही ग्रह कौटुंबिक सुख व गृहसौख्यात बाधा आणतील जपा. भाग्यस्थानी असलेल्या गुरु ग्रहामुळे संततिसुख लाभेल. आध्यात्मिक उपासनेत प्रगती होईल व प्रतिकुल काळ सुसह्य होईल. श्रद्धेने बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे नियमितपण पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल व मनोनुकुल घटना घडविणारा असल्याचा अनुभव येईल. ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभाचे योग आहेत अशापैकी काहीना असा धनलाभ होणेसंभवते. तसेच काहीना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होणेही शक्य आहे. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना, वकिली-सल्लागारी व्यवसाय असणारांना, उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. मात्र विविध कारणांनी संततिसुखात बाधा येणे संभवते. जपा. शासकीय नोकरदार मंडळीना

बढती, पगारवाढ, उच्च पद अशापैकी काही प्राप्त होणे संभवते. अशा अनुकुल काळातही या राशीच्या काहीना आर्थिक समस्या त्रस्त करतील, तर काहीना आर्थिक जबाबदाऱ्या कशा पार पडतील याची चिंता त्रस्त करील. काही मंडळीना आरािथक घोटाळ्याची समस्या त्रस्त करील . जपा. शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मानहानी वा अन्य प्रकारचा त्रास होणे संभवते. तरीही या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना परदेशगमनाचे योग संभवतात. तसेच राहूमुळे कौटुंबिक सुख व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. जपा. पण भाग्य स्थानी असलेल्या शुक्रामुळे विपरीत परिस्थितीत काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या व्यापारी मंडळीना स्त्री - ग्राहक ांकंडूनचअधिक अर्थलाभ होईल. मन:शांतीसाठी आध्यात्मिक उपासना करा. श्रद्धेने दररोज नियमितपणे श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळीची मनस्थिती व विचारशक्ती अत्यंत अस्थिर, चंचल अशी झाली असावी, असे वाटते. त्यामुळे अविचाराने खर्च होणे संभवते. जपा. तसेच अशा अवस्थेत विचित्र आचरण होणेही संभवते. स्वत:वरील संतापाने इतरांशी बोलणेही धारदार, फटकळ इच्छा नसताना समोरच्याचा अपमान करणारे असे होत असावे, असे वाटते. शीघ्र मानसिक संवेदना, आर्थिक चिंता यामुळेही असे आचरण घडत असावे, असे वाटते. हळव्या मनस्थितीमुळे मनाविरुद्ध थोडेही काही घडले तरी गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. अशा परिस्थितीत मन व बुद्धी शांत ठेवून व आध्यात्मिक उपासनेत लक्ष घातलेत तर खूपच सुखाचे होईल. मंगळ व राहू हे दोन ग्रह कौटुंबिक सुख, गृहसौख्य व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा आणतील. जपा. अशा विपरीत काळातही या राशीच्या विवाहेच्छू वधू वरांचे विवाह ठरतील व संपन्न होतील. तसेच प्रेमसंबंध असतील तर ते घट्ट होतीलसे दिसते. या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याचा पूर्वार्ध नोकरीत मनस्ताप देणाराच असल्याचा अनुभव येईल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती बदलेल व मनोनुकुल घटना घडतील. मात्र वाममार्ग धन सहज मिळणे शक्य असले तरी कटाक्षाने तो मोह टाळाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. शत्रुराशीतील शनीमुळे या राशीच्या स्वतंत्र व्यावसायिकाना काळ प्रति कुल असल्याचाच अनुभव येईल. पण उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल व प्रगतिकारक असल्याचा

अनुभव येईल. गुरु-शुक्र ग्रहांच्या अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल नसल्याचाच अनुभव येईल. सध्या या राशीच्या मंडळीचा स्वभाव अत्यंत अस्थिर, चंचल व लहरी असा झाला असण्याची शक्यता जाणवते. कोणाचाही धाक, दडपण, केलेला उपदेश असह्य होत असावा, असे वाटते. या राशीच्या लहान मुलांना पालकांनी विशेष जपावे. या राशीची लहान मुले या काळात अत्यंत हूड, व्रात्य अशी होणे संभवते. जपा. मानसिक चिंता, शीघ्र मानसिक संवेदना होत असल्यास मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहू व मंगळ या ग्रहांमुळे वैवाहिक जीवनातील सुखातही विविध कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी भागीदारी संबंधात बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. तसेच कोर्ट प्रकरणे असतील तर त्यांचाही त्रास होणे संभवते. काही मडळीच्या मनात कपटी विचारांचा प्रभाव पडण्याची शक्यता जाणवते. तसेच काहींना वाईट मार्गाने प्रसिद्धी मिळणेही संभवते. जपा. बौद्धिक व शैक्षणिक नोकरी-व्यवसाय असणारांना व गुप्त पोलीस खात्यातील कर्मचा ऱ्याना काळ अनुकुल व सुखकारक जाईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. मात्र चंचल स्वभावावर ताबा ठेवता आला पाहिजे. अशा प्रतिकुल काळातही या राशीच्या काही भाग्यवंताना दूरच्या प्रवासाची संधी मिळेल. मन:स्वास्थ्य व आत्मविश्वास वाढण्यासाठी श्रीगुरु देवदत्तात्रेयाची उपासना करा. “बावन्न श्लोकी गुरुचरित्राचे “ पठण करा.

======ooooo0ooooo======